# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३७०-२२** **दिनांक ०५/१२/२०२२**

## युवकास मारहाण झाल्याने समाजमाध्यमांवर व्हायरल होत असलेल्या चुकीच्या व गैरसमज पसरविणा-या माहितीवर विश्वास न ठेवण्याबाबत पोलीसांचे आवाहन.

दिनांक २९/११/२०२२ रोजी आदम खान नावाच्या तरुणास जमावातर्फे मारहाण करण्यात येत असल्याबाबतचा व्हिडीओ (चित्रफित) सध्या समाजमाध्यमांवर प्रासारित (व्हायरल) होत असून सदरच्या घटनेस काहि समाजमाध्यमांवर जातीय व धार्मिक रंग देवून चुकीची माहिती पसरविण्यात येत आहे. परंतू सदरच्या घटनेचा कोणत्याही धार्मिक किंवा जातीय बाबींशी संबंध नसून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील पेल्हार पोलीस ठाणे हद्दिमध्ये दिनांक २९/११/२०२२ रोजी आदम शेरमोहम्मद खान हा इसम पांडे चाळ, संतोषभुवन नाका, नालासोपारा पुर्व या ठिकाणी फिर्यादी यांच्या राहते घरामध्ये सकाळच्या सुमारास चोरी करण्याच्या इराद्याने घराचा कडीकोयंडा तोडून चोरी करण्याचा प्रयत्न करित असतांना त्यास स्थानिकांनी बघितले असता सदर परिसरातील नागरिकांनी इसम नामे आदम खान यास मारहाण केली होती. त्याचप्रमाणे संशईत आदम खान यास जमावाकडून मारहाण होत असतांना तो कोणत्या जातीचा किंवा धर्माचा आहे याबाबत स्थानिकांना कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याचे तपासामध्ये आढळून आले आहे. सदर जमावातील व्यक्तींनी तात्काळ पोलीसांना न कळविता संशईतास मारहाण केल्याने पेल्हार पोलीस ठाणे येथे I गुरनं १००९/२०२२ भादंवि ३२६, ३२४, १४३, १४७,१४८, १४९ प्रमाणे जमावातील व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे आणि तपासकामी त्यांची दिनांक ५/१२/२०२२ रोजीपोवेतो मा. न्यायालयाने पोलीस कोठडी मंजूर केलेली आहे.

त्याचप्रमाणे प्राथमिक तपासामध्ये संशईत इसम नामे आदम शेरमोहम्मद खान हा सदर ठिकाणी चोरी करण्याचे उद्देशाने आला असल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन त्याचेविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गुरनं १००७/२०२२ भादंवि ३८०, ४५४, ५११ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संशईत नामे आदम खान याचेविरुध्द कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई शहर येथे खून, दरोडयाचा प्रयत्न, बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणे, घरफोडी करणे, जबरी चोरी करणे, दुखापत करणे, चोरी करणे, बलात्कार अशा गंभीर स्वरुपाचे १३ गुन्हे दाखल असून तो रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत पेल्हार पोलीस ठाण्यामध्ये दाखल गु.र.नं. १००९/२०२२ मधील आरोपींविरुध्द कसुन तपास करुन गुन्हयाची प्राधान्यक्रमाने निर्गती करण्यात येईल. या पार्श्वभुमीवर मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने याद्वारे सर्व नागरिकांना आवाहान करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही व्हिडीओ क्लीप (चित्रफित), संदेश, फोटो किंवा मजकुर यावर विश्वास ठेवू नये व ती प्रसारित (व्हायरल) करण्यात येवू नये. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे दोन समाजामध्ये गैरसमज निर्माण करण्याच्या प्रयत्न करु नये असेही आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मार्फत करण्यात येत आहे.

---ooo---